परवानगी वर्ष : ~~२०x०३x२०~~ २००३- २००४

माध्यम : इंग्रजी

कायम विना अनुदान.

जा.क्रं.माध्य-३/१४/प्रथम मान्यता/पुवि/२० ०५

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,

पुणे - १ यांचे कार्यालय

दिनांक :- 27 JUN 2006

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

जिल्हा परिषद, पुणे.

विषय :- प्रथम मान्यता . . .
प्रियदर्शनी इंग्लिश मेडी. स्कुल, पॉलीग्रास हॉकी स्टेडियमजवळ, पिंपरी पुणे.

संदर्भ :- १. आपले पत्र क्रं. शिक्षण/माध्य/ह-४/प्र. मा/२९७/०५ दि. २१/७/०५

२. शा.प.क्रं. नमाशा १००४/[३७८/०४]माशि-१ दि. ५/७/२००४

३. कार्यालयाचे पत्र क्रं माध्य-३/१४/नमाशा/मान्यता/पुवि/०५/११५२६/११३०/दि. १८/६/२००५.

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२ व ३.३ अन्वये हृदयराज लक्ष्मण शिक्षण संस्था, नेहरूनगर, पिंपरी, पुणे संस्थेच्या प्रियदर्शनी इंग्लिश मेडीयम स्कुल, पॉलीग्रास हॉकीस्टेडीयमजवळ, पिंपरी, पुणे. माध्यमिक शाळेच्या इयत्ता आठवी च्या वर्गास २००३ - २००४ या शैक्षणिक वर्षासाठी जून २००३ पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींची पूर्तता अधिन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा.

१. संस्थेने स्वत:च्या मालकीची शैक्षणिकदृष्ट्या योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन घ्यावी.
२. मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तींची नेमणूक करावी.
३. स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानीशी उपलब्ध करुना घ्यावी.
४. स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथांची भर घालावी.
५. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घ्यावे.
६. पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन घ्यावा.
७. स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन घ्यावी.
८. वाढीव फी चे दर मा. शिक्षण उपसंचालक पुणे विभाग, पुणे १ यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत.
९. शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०. कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणी नुसार वेतन अदा करावे.
११. शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२. विद्यार्थ्यांची वैद्यकिय तपासणी करावी.
१३. तपासणी अहवालातील सुचनांची पूर्तता करावी.
१४. पालक शिक्षक संघाची स्थापना करावी.
१५. विद्यार्थ्यांसाठी संगणक सुविधा उपलब्ध करावी.
१६. विद्यार्थी संख्या वाढवावी.
१७. सोबतच्या त्रूटींची पूर्तता करण्याच्या अटीवरच सदरची प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची सही आहे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे -१ कोटेवा

प्रत - १. मुख्याध्यापक, प्रियदर्शनी इंग्लिश मेडियम स्कुल, पॉलीग्रास हॉकीस्टेडीयमजवळ पिंपरी, पुणे.

२. निवडनस्ती

क्रमांक-शिक्षण/खाप्राशा/३/कावि/ 13 /२००8

शिक्षण मंडळ कार्यालय,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८.

दिनांक 20/9 /२००8.

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,

~~प्रियदर्शनी पुल्यारी इंग्लिश~~

~~स्कूल नेहरूनगर पिंपरी~~

विषय :- कायम विना अनुदान तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचा/अतिरिक्त तुकडया मंजूर करणे बाबत. [इंग्रजीमाध्यम]

संदर्भ :- १] शासन निर्णय क्रमांक व्हीएलएस/१००२/[१०००/०२] /प्राशि-३ दि. १४ जानेवारी २००३.

२] आपणाकडील दि. 2/9/08 चा प्रस्ताव.

संदर्भांकित पत्रास अनुसरून आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमुद इयत्ताच्या नैसर्गिक / ~~अतिरिक्त~~ तुकडया वर्गांना २००3– २००8 या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ नैसर्गिक का ~~अतिरिक्त~~ | ~~विनाअनुदानित~~ / कायम विना अनुदानित तत्वावर |
|---|---|---|---|---|---|
| | प्रियदर्शनी पुल्यारी इंग्लिश स्कूल नेहरूनगर पिंपरी. | इंग्रजी | इ.२ ते इ.८वी | नैसर्गिक | इ.२ री ते इ.८वी च्या प्रत्येकी पहिल्या वार्षिक नैसर्गिक वाढीस मंजूरी |

शाळेने सदरचे वर्ग अथवा तुकडी मंजूरीसाठी खाली नमुद केलेल्या अटीची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१] शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक

२] सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन वि[illegible] सुविधा उपलब्ध करुन दयावयास हव्यात.

३] सदर शाळेने स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली केलेली असावयास हवी.

४] शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.

५] सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

६] सदर शाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी / वर्ग मान्यता रदद् करण्यात येईल.

वरील बाबींची पूर्तता करुन लेखी अहवाल एक महिन्यात सादर करावा.

प्रशासन अधिकारी,
शिक्षण मंडळ,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - १८.

प्रत :- माहितीसाठी.

१] मा. शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे.

९८ ६५४/५२

तात्काळ
कायम विनाअनुदान

जा.क्र.माध्य.३/१४/नमाशा/पुवि/२००४
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 4 AUG 2004

प्रति

सचिव,
हृदयराज लक्ष्मण शिक्षण संस्था, नेहरुनगर,
पिंपरी, पुणे.

**विषय :** २००३-२००४ या शैक्षणिक वर्षात कायम विनाअनुदान तत्वावर नविन माध्यमिक शाळांना परवानगी देणेबाबत.

**संदर्भ :** १. शासन पत्र क्र. नमाशा/१००४/(३७८/२००४)/माशि-१, दिनांक ५.७.२००४
२. मा.शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र. अमाशा/१००२ के/नमाशा/६५१७०/१५-क, दि. २८.९.२०००

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, खाली नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थेस तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्वावर नविन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाच्या विचाराधीन आहे.

| अ. क्र. | शैक्षणिक संस्थेचे नांव | ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | हृदयराज लक्ष्मण शिक्षण संस्था, नेहरुनगर, पिंपरी, पुणे. | पॉलीग्रास हॉकी स्टेडीयम जवळ, पिंपरी, पुणे | आठवी | इंग्रजी |

**कायम विना अनुदान**

आपल्या शाळेस माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खालील नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवरच नविन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येणार आहे.

१. इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेसाठी भविष्यकाळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही किंवा विद्यार्थ्यांच्या फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांच्या सहीचे लेखी हमीपत्र सादर करावे.
२. सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे (उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत) तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.
३. आपल्या संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.
४. आपण आपल्या संस्थेच्या अध्यक्षांचे सदरची माध्यमिक शाळा कायम विनाअनुदान तत्वावर चालविण्यास तयार असल्याबाबतचे शपथपत्र (रु. २०/- च्या स्टँप पेपरवरील) आपल्या जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे प्रतिस्वाक्षरीसह सादर करणे आवश्यक आहे.
५. आपली संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १९६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
६. संस्थेविरुध्द गंभिर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
७. सदर संस्थेने चालविलेल्या शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
८. सदर संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबत तक्रारी नाहीत तसेच सदर संस्थेची एखादी शाळा शासनाने ताब्यात घेण्याचे प्रकरण प्रलंबित नाही.
९. सदर संस्थेमार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावांच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही.
१०. शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र. एसएसएन २१०३/(५०/०३) माशि-२, दिनांक २७ मे, २००३ मधील अटी व शर्ती, कार्यपध्दती संस्थेवर बंधनकारक राहतील.

सदरचे पत्र प्राप्त होताच वरील १ ते १० विहित बाबींची पूर्तता केली असल्याचे संस्थेने सात दिवसाचे आत आपल्या जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांना आवश्यक त्या कागदपत्रासह/प्रमाणपत्रासह कळवावे.

स्वाक्षरीवर शि. उ. सं. यांची
सही असे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी.

१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे
आपण संबंधित अटींच्या संदर्भात आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची/प्रमाणपत्रांची तपासणी करुन प्रस्ताव तीन दिवसात आपल्या अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावा.

२. मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ - यांना सविनय सादर

पुणे जिल्हा परिषद, पुणे.
"यशवंतराव चव्हाण भवन"
शिक्षण [माध्यमिक] विभाग.
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह-४/२६३
नै.वाढ/०६-०७.
पुणे. दिनांक : १०/८/२००६.

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
~~प्रियदर्शिनी इंग्लिश मिडीयम स्कूल,~~
~~नेहरूनगर, पिंपरी, पुणे-१८.~~

विषय : नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत.२००४-०५
===== ~~इ.६ वी~~, ~~इ.७ वी~~, इ.९ वी, ~~इ.१० वी~~.

आपल्या ~~हृदयराज लक्ष्मण शिक्षण संस्था, नेहरूनगर, पिंपरी.~~ या शैक्षणिक संस्थेव्दारा संचलित ~~प्रियदर्शिनी इंग्लिश मिडीयम स्कूल, पिंपरी~~ माध्यमिक विद्यालयास इ.८ वी/~~इ.५~~ वी.चा वर्ग सुरु करणेस सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षापासून मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र.माध्य/३[१४]/नमाशा/मान्यता/पुव/११५२६/३०, दि.१८/६/२००५ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे.सन २००४-२००५ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ.६ वी~~, ~~इ.७ वी~~, इ.९ वी, ~~इ.१० वी~~ चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे.सदर वर्गास जून २००४ पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देणेत येत आहे.तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी संबंधित उपशिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, पुणे/~~गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती~~ यांचेशी संपर्क साधावा.तसेच शाळेची वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इ.१० वी.चा वर्ग सुरु होत आहे, अशा सर्व माध्यमिक शाळांनी मा.विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.

उपरोक्तप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी अन्यथा शाळेस संकेतांक न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही, याची नोंद घेणेत यावी.

(स्वाक्षरी)

शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद, पुणे

पुणे जिल्हा परिषद, पुणे.
"यशवंतराव चव्हाण भवन"
शिक्षण [माध्यमिक] विभाग.
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह-५/1225
नै.वाढ/०४.
पुणे. दिनांक : ५/१०/२००५.

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
~~प्रियदर्शनी इंग्लिश मिडीयम स्कूल,~~
~~नेहरूनगर, पिंपरी, पुणे-१८.~~

विषय : नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत.२००५-०६
===== ~~इ.६ वी~~, ~~इ.७ वी~~, ~~इ.९ वी~~, इ.१० वी.

आपल्या ~~हृदयराज एज्युकेशन संस्था, नेहरूनगर, पिंपरी~~ या शैक्षणिक संस्थेव्दारा संचलित ~~प्रियदर्शनी इंग्लिश मिडीयम स्कूल, पिंपरी-१८~~ माध्यमिक विद्यालयास इ.८ वी/~~इ.५~~ वी.चा वर्ग सुरु करणेस सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षापासून मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र.माध्य/३[१४]/नमाशा/मान्यता/पुवि/9823६/38, दि. २७/६/२००६ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ.६ वी~~, ~~इ.७ वी~~, ~~इ.९ वी~~, इ.१० वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे. सदर वर्गास जून २००५ पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी संबंधित उपशिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, पुणे/~~गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती~~ यांचेशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इ.१० वी. चा वर्ग सुरु होत आहे, अशा सर्व माध्यमिक शाळांनी मा.विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.

त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी अन्यथा शाळेस संकेतांक न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही, याची नोंद घेणेत यावी.

शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद, पुणे करिता.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे